## प्रकरण - तिसरे

# देवदासी प्रथेचे स्वरुप

## प्रकरण - ३
# देवदासी प्रथेचे स्वरुप

प्रारंभीच्या काळात देवदासी गळयांमध्ये, हातांमध्ये फुलांच्या माळा घालून, देवळात राहून सकाळ, संध्याकाळ देवांच्या मूर्तींना चवरीने वारा घालणे, देवळात रोज देवापुढे नृत्य व गायन करणे, उत्सवाच्या वेळी कुंभारतीची ज्योत नेणे, तसेच मिरवणुकीच्या वेळी पालखीपुढे गाणे म्हणत नाच करणे इ. कामे करत असत आणि त्या कामाचा मोबदला म्हणून राजेलोकांकडून त्या देवदासींना काही रक्कम, बिदागीही मिळत असे. याशिवाय देवस्थान कमिटीकडून त्या देवदासींना वतनी जमीनही मिळत असे. त्यावर त्यांचा उदरनिर्वाह होत असे. परंतु नंतरच्या काळात त्यांचे देवाबरोबर लग्न लावले जात असल्याने त्यांना प्रत्यक्षात लग्न करण्याचा अधिकार राहिला नाही.

देवदासी पूजेच्या वेळी देवदेवतांना संतुष्ट करण्यासाठी फुले, धूप, धान्य, शिजविलेले अन्न, पेय इ. वस्तू अर्पण करीत असत. कारण या मागे देवदेवतांनी सुध्दा भौतिक सुखाचा लाभ घ्यावा ही भावना होती. त्याचप्रमाणे देवांनी स्त्रियांचाही उपभोग घ्यावा त्याकरिता सुंदर, देखण्या तरुण मुली देवांना अर्पण कराव्यात ते पवित्र कार्य आहे. ते केल्याने मानवाला स्वर्गात मोक्ष प्राप्त होतो असेही मानले जात असे. [१]

पुढे त्या मंदिरातील पुजाऱ्यांशी शारीरिक संबंध ठेवू लागल्या. पण कालांतराने राजे, महाराजे व पुजारी यांच्यात देवदासींच्या हक्कांबाबत भांडणे होऊ लागली. जसा देवांच्या नैवद्यांवर पुजाऱ्याचा हक्क आहे, तसाच देवाला वाहिलेल्या देवदासीवरही पुजाऱ्यांचाच अधिकार आहे. असा दावा पुजाऱ्यांनी केला तर आम्ही देवदासींची नेमणूक करतो त्यांना रोख रक्कम, वतनी जमीन इनाम म्हणून देतो. त्यामुळे तिच्यावर आमचा हक्क आहे असा दावा राजे लोकांनी केला. पुढे त्यांच्यात समझोता होऊन देवदासींच्या उरोभागावर शंख, चक्र, गरुड अशी चिन्हे मुद्रांकित करण्यात येऊ लागली. त्यामध्ये शंख असलेली देवदासी पुजाऱ्यांची तर 'चक्र' व 'गरुड' असलेली देवदासी राजांची असे ठरले. कालातरांने मंदिरे नष्ट झाली व त्यांना मिळणारी बिदागीही संपुष्टात आली. त्यातच गावातील पाटील, इनामदार, सरदार, यात्रेकरु मंडळीही देवदसींचा शारीरिक भोग घेऊ लागले. त्यामुळे देवदासी या मंडळीच्या कामवासनेचे एक साधन बनल्या. कालांतराने सर्व संस्थाने नष्ट झाल्याने त्यांना मिळणारा परंपरांगत हक्क व दर्जाही नष्ट झाला. त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. शेवटी उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांनी वेश्याव्यवसाय

करण्यास सुरवात केली.आजही मुंबई इलाख्यातील धोकादायक परिसरामध्ये जवळजवळ ९०% वेश्या यापूर्वी देवदासी सोडलेल्या आहेत. त्यातही ८०% वेश्या दलित समाजातीलच आहेत. त्यांना अतिशय मागासलेपणाचे जीवन जगावे लागत असले तरी त्या देवदासींच्या विवाह विधीची, त्यांच्या प्रतीकांची, त्यांच्याशी संबंधित असलेल्या इतर धार्मिक प्रथांची, सण उत्सवांच्या स्वरुपाची चर्चा करणे गरजेचे आहे.

देवदासी म्हणजे 'देवांची गणिका वृत्तीने सेवा करणारी स्त्री होय'. अशी जरी देवदासींची व्याख्या केली जात असली तरी आज देवदासींची व्याख्या " देवदासी म्हणजे दैवत प्रेषित देव किंवा देवी अथवा धार्मिक संस्था यांना वाहण्यात आलेली कोणतेही महिला अशी केली जाते."[२] सामान्यत: भारतातील निरनिराळ्या प्रदेशांमध्ये प्राचीन काळापासून ही प्रथा आढळते. देवदासींमध्ये एका रात्रीची, नऊ रात्रीची व कायमची असे प्रकार आहेत. जी देवदासी स्त्री लग्नानंतरची पहिली रात्र देवळांतील पुजाऱ्याबरोबर घालविते. ती एका रात्रीची देवदासी होते ही पध्दत गुजरातमध्ये आढळते. तर ज्या ठिकाणी नवरात्रीच्या उत्सवात पालकमंडळी आपल्या मुलींला नऊ रात्री दुसऱ्यांना उपभोगण्यास दान देतात. त्याठिकाणी ही देवदासी नऊ रात्रीची मानली जाते. ही पध्दत मुख्यत: राजस्थानामध्ये आढळते. सध्या या प्रथेविरुध्द कायद्याने बंदी असल्याने छुप्या पध्दतीने हे प्रकार तेथे आजही चालत असतात. तसेच कर्नाटक व महाराष्ट्रामध्ये ज्या देवदासी आहेत त्या कायम स्वरुपाच्या म्हणजेच सतत शारीरिक भोग देणाऱ्या आहेत. आपली मुलगी देवदासी सोडल्याने, दुसऱ्याला उपभोगण्यास दिल्याने, गावावर व घरावर कोणतेही संकट येत नाही, शेतीला बरकत येते, अशी धार्मिक अंधश्रध्दा या लोकांमध्ये असते. म्हणूनच ते आपल्या मुलीं देवदासी म्हणून देवाला सोडतात.[३] भारतांमध्ये महाराष्ट्रासह निरनिराळया प्रांतामध्ये देवदासींना वेगवेगळया नावांनी ओळखले जाते. विविध प्रांतानुसार देवदासींना प्रामुख्याने बंदी, देवळी, भाविणी, कसबिणी, कलावंतिणी, जोगतिणी, झारणी, सुळी, बसवी, मातंगी, दालर, आराधिणी, भोरे, मुरळी, मायीणी, शरणी, भोगम्मा, महारिस इ. नावाने ओळखले जाते.[४] या सर्व देवदासी देवांच्या बायकां पण रखेल्या मात्र गावाच्या असत. देवाधर्माच्या नावावर गावप्रमुख पाटील, इनामदार, पुरोहित, पुजारी ही भोगवादी मंडळी त्यांचा उपभोग घेत व त्यांना अनैतिक मार्गाला लावले जाई. आज देखील बऱ्याच ठिकाणी असे प्रकार उघडपणे व गुप्तपणे घडताना दिसून येतात.

महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सीमा भागात तसेच खुद्द कर्नाटकामध्ये ज्या काही देवदासी दिसतात.त्या प्रामुख्याने बेळगाव जिल्हयातील सौंदत्ती, कोकटनूर तर शिमोगा जिल्हयातील चंद्रगुत्ती येथील रेणुकांबा व रेणुका देवीला वाहिल्या जातात. तर पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्हयातील जेजुरी व सातारा जिल्हयातील पाली येथे खंडोबाला मुरळया वाहिल्या जातात पण कायद्याने आता या प्रथेवर बंदी असल्याने आज देवदासी, मुरळया होण्याचे प्रमाण कमी झालेले दिसते. केवळ मुंबई व पुणे जिल्हयातच नव्हे तर सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर इ. जिल्हयामध्ये तर कर्नाटकातील धारवाड, विजापूर, बेळगाव, गुलबर्गा इ. ठिकाणी देवदासी व मुरळयांची संख्या मोठी आहे. महाराष्ट्रापेक्षा कर्नाटकामध्ये देवदासी स्त्रियांची संख्या जास्त प्रमाणात आहे.

आजही रेणुका देवीची पूजा ब्राम्हण जातीपासून ते महार, मांग जातीपर्यंतचे लोक करतात. पण या देवतेला मुली वाहण्याची चाल फक्त मांग, महार, ढोर, चांभार, वडार, डवरी, बोयाज, भुरड, भुरटी इ. अस्पृश्य व मागासलेल्या समाजामध्येच मोठया प्रमाणात आहे. काही ठिकाणी अशिक्षित मराठा जातीमध्येही मुली देवाला सोडल्या जातात. पण त्या मुलींना घराचा आधार असतो. त्या मंगळवार, शुक्रवार जोगवा मागतात व घरी नीटपणे स्वच्छ राहतात. घरची परिस्थिती गरीब असेल तर त्यांची परवडच सुरु होते.[५] परंतु त्या शक्यतो वेश्या व्यवसाय स्वीकारीत नाहीत. आपले शील जपतात. धुणी-भांडी करुन, शेतीची कामे करुन आपली व कुटुंबाची गुजरण करतात.

घरातील पालकमंडळी दीर्घकाळ आजारपण, घरातील संकटे, अपत्य न होणे, झाल्यास ते मूल न जगणे, गावामध्ये रोगराई येणे, केसांमध्ये जट येणे इ. कारणांमुळे आपल्या मुलींना तिच्या बाल्यावस्थेत देवाला सोडतात. कारण घराण्यातील एखादी मुलगी जरी देवीला सोडली तर घरांवर, गावांवर कोणतेच संकट येत नाही. अशी अघोरी अंधश्रध्दा या अशिक्षित पालकांमध्ये व देवदासींमध्ये दिसून येते. पण ज्या मुली देवीला / देवाला सोडल्या जातात त्या अल्पवयीनच असतात. देवदासी म्हणजे काय ? हे कळण्याचेही त्यांचे वय नसते तेव्हा त्यांना यल्लम्मा देवीला 'बाळ' जोगतिण म्हणून वाहिले जाते. या जोगतिणीचे ३ प्रकार आजही अस्तित्वात आहेत.

## <u>यल्लमाच्या जोगतिणी</u>

यल्लम्माच्या उपासकांना जोगता /जोगतिण असे म्हटले जाते. त्या प्रामुख्याने बाळ जोगतिण, गरती जोगतिण, विधवा जोगतिण या ३ प्रकाराच्या असतात त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

१) **<u>बाळ जोगतिण</u>** - कुठल्यातरी कारणाने बालवयातच देवीला सोडलेली मुलगी म्हणजेच बाळजोगतिण होय. तिला शुध्द, पवित्र मानले जाते. बाळ जोगतिणीला फार मान असतो. कुणाचा नवस फेडण्यासाठी जेवायला म्हणून तर कुणाला नवसानिमित्त लिंब नेसविण्यासाठी तिला निमंत्रित केले जाते. कोणाच्याही घरच्या यल्लमाविषयक कुळाचारात बाळ जोगतिणीला महत्वाचे स्थान असते.[६] सावली संस्थेच्या अध्यक्षा सुशिलाबाई नाईक या स्वत: बाळ जोगतिणी होत्या, तर सध्याच्या देवदासी मुक्ती संघटनेच्या पुर्नवसित देवदासी गौराबाई सलवादे यादेखील बाळजोगतिणी आहेत. त्यांच्या मते, 'त्यावेळी ही प्रथा वाईट आहे असे अजिबात वाटत नव्हते उलट आपल्या अंगात देव आहे असे वाटायचे सगळीकडे मान मिळायचा' गडहिंग्लजमध्ये ज्याठिकाणी मानाचा जग असायचा, त्या ठिकाणी बाळ जोगतिणीलाच नेत असत. त्यावेळी त्या जगाबरोबर त्या स्वत: गावांमध्ये बाळ जोगतिणी म्हणून फिरत असत.[७]

२) **<u>गरती जोगतिण</u>** - लग्नानंतर जिला देवाला सोडले जाते तिला गरती जोगतिण म्हणतात. संसाराच्या मध्यावर घरच्या अडचणी दूर करण्यासाठी तिला गरती जोगतिण म्हणून सोडले जाते. तिने संसार संभाळून देवीची पूजा करायची असते.

३) **<u>विधवा जोगतिण</u>** - पती निधनानंतर जिला देवीला सोडले जाते तिला विधवा जोगतिण असे म्हणतात. खरे तर पोटापाण्याचे चालण्यासाठी हा मार्ग तिने स्वीकारलेला असतो.[८] यावरुन अशी स्त्री केवळ गरिबी व हलाखीच्या परिस्थितीमुळेच देवदासी होत असावी असे दिसते. शिवाय जोगतिणपण स्वीकारल्यामुळे वैवाहिक जीवनाला मुकलेल्या स्त्रीला शारीरिक गरजही भागवता येत असल्यामुळे अशा जोगतिणी होत असाव्यात. ही शक्यता नाकारता येत नाही.

## <u>देवदासीचा विवाहविधी</u>

महाराष्ट्र व कर्नाटक सीमा भागात व खुद्द कर्नाटकात देवदासीचा विवाह असा होतो.

सामान्यत: ज्या मुलीला देवदासी म्हणून सोडायचे असते. तिला सौंदत्तीच्या यल्लमाला न्यायचे असते. अशावेळी सोबत अनुभवी जोगतिणी नेल्या जातात. ज्या घरुन मुलगी सोडायला नेली जाते. त्या

घरी प्रथम पाच देवदासी जाऊन देवीची पूजा करुन नारळ फोडतात व वऱ्हाड निघते. याचवेळी मुलीचा विवाहविधी केला जात असल्यामुळे यात्रेला निघणाऱ्या बैलगाड्यांबरोबरच ही मंडळीही जातात. एकतर मलप्रभा नदीवर किंवा जोगुळवावीत देवदासी होणाऱ्या मुलीला अंघोळ घातली जाते आणि तिथून लिंब नेसवून तिला डोंगराकडे नेले जाते व देवीच्या देवळाला पाच प्रदक्षिणा घालायला लावतात. त्यानंतर विवाहविधी संपन्न होतो. हा विवाहविधी पूर्वी मंदिरासमोर देवीबरोबर लागत असे. पण आज कायद्याच्या भीतीने तो पुजाऱ्याच्या घरी होत असतो. या विवाहविधीमध्ये एखाद्या ताम्हणात, तांब्यावर नारळ ठेवून खालून उपरण्याचे धोतर नेसवतात, वर पागोटे बांधतात. हेच देवीचे प्रतीक मानले जाते. मग मांडव घालून वाजंत्री लावून त्या नाराळाशी त्या मुलीचे लग्न लावले जाते. लग्न लावताना तिने लिंब सोडलेला असतो व साडी नेसलेली असते. त्यावेळीही जोगतिणींच्या व जोगत्यांच्या परड्या पुजल्या जातात. लिंब नेसवणे व लुगडे नेसवणे ही कामे जोगते करतात. या कामाकरिता गुरवाला २० ते ५० रुपये दक्षिणा मिळते. लग्नविधी झाल्यानंतर डोंगर उतरुन परत आल्यावर मुलीने गावाच्या नदीमध्ये स्नान करायचे असते. आंबिल यात्रेमध्ये सहभागी व्हायचे असते. मग ती गांवामध्ये प्रवेश करते. त्यानंतर तिने पाच जोगतिणींबरोबर पाच गावात किंवा पाच घरी जोगवा मागायचा अशी प्रथा असते.[९]

देवदासी झाल्याचे प्रतीक म्हणून 'बांबूचीपरडी' व ' कवड्याची माळ' तिच्या स्वाधीन केली जाते. हाच देवदासींचा शिक्का असतो. तिच्या विवाहाच्यावेळी पांढऱ्या, लाल मण्याची माळ असलेले 'दर्शन' घातल्यानंतर ते मरेपर्यंत सुटत नाही. दर्शन गळ्यात घातल्यावर उपस्थित पाच जोगतिणींच्या जग, परड्या पुजायचे असतात. ज्यादिवशी देवदासींचा विवाहविधी संपन्न होतो. त्यादिवशी या आनंदप्रित्यार्थ त्या मुलीचे आईवडील इतर जोगतिणींना आपल्या घरी बोलावून जागर घालतात. त्यांना पुरणपोळीचे किंवा गोड लाडूचे जेवण देतात. जोगतिणींना बांगड्या भरतात. तसेच त्यांना लुगडे चोळीचा आहेर देतात. त्यांच्याकडून ती देवदासी, मोरपिसे, कवड्याची माळ ही प्रतीके असलेली एक परडी स्वीकारते. ही प्रतीके जवळ असल्याशिवाय तिला गावामध्ये जोगवा मागता येत नाही.[१०]

याशिवाय ज्यावेळी तिचा विवाहविधी होतो त्यावेळी जो विवाह लावणारा पुजारी, गुरव असतो तो देवदासींच्या कानांमध्ये काही पथ्य मंत्र सांगतो. त्याला ' धार्मिक गुरु आज्ञा' असेही म्हणतात त्या 'गुरु आज्ञा ' अशा आहेत -

१. भक्ताशी विश्वासार्ह वर्तन करणे.

२. समाजात सत्य बोलणे (ज्या गावात तिला रहायचे असते. तेथील लोकांशी जो संबंध असेल तो सत्यावर आधारीत असावा असेच काही म्हणता येईल.)

३. जोगवा मागताना ज्या काही वस्तू मिळतात, त्यातील काही वस्तू शिल्लक ठेवणे (अर्थात उधळपटी न करता उद्याच्या दिवसांवर नजर ठेवून काटकसरीने जगणे.)

४. गावात कोणी व्यक्ती मयत झाल्यास त्याचा दहन, दफन विधी पूर्ण होईपर्यंत न जेवणे. तो विधी पूर्ण झाला की अंघोळ करुन अन्न सेवन करणे.

५. रात्री घरी जेवण करत असताना जर दिवा विझला तर जेवण तेथेच थांबवणे (पुन्हा जेऊ नये.)

६. बाळंत स्त्रीच्या घरी सव्वा महिना जेवायचे नाही, (बाळंत स्त्रीच्या विटाळाला अपवित्र मानले जात असावे तसेच त्या घरी जोगवाही मागायचा नाही. माहित नसताना जर कोणी जोगवा मागितला तर त्या घरचे लोक वाढता येत नाही म्हणून जोगवा देण्यास नाकारतात.)

७. श्राध्दाचे, पाचवीचे जेवण देवदासी स्त्रीने जेवायचे नाही.

८. देवदासी स्त्रीने लग्नाचा विचार करायचा नाही (केला तर झुलवा नाहीतर तसेच रहायचे)[११]

या सर्व गुरु आज्ञा सांगितल्यानंतर पुजारी देवदासींच्या गळ्यांत 'दर्शन' बांधतो. तिच्या डोक्यात भंडारा टाकतो. त्यावेळी सर्वजण ' आई रेणुकेचा उदे s उदे ss उदे sss...' असा गजर करतात. त्यानंतर तिचे परशुरामाबरोबरही लग्न लावले जाते. पुढे डोंगर उतरुन आल्यानंतर पुराणपोळीच्या किंवा लाडूच्या गोड जेवणाचा, जागरणाचा कार्यक्रम पार पाडला जातो. अशाप्रकारे देवदासींचा विवाहविधी होतो. पण बऱ्याच वेळेला ही पालकमंडळी त्या मुलींची इच्छा नसतानाही स्वतःच्या स्वार्थापोटी, नवसापोटी देवीला सोडतात. पुढे ती मुलगी देवदासी झाल्यानंतर तिच्या जीवनाची परवडच सुरु होते.

## मातंगीचे स्वरुप

कर्नाटकांमध्ये व आंध्र प्रदेशामध्ये मादिगा (मातंग) परिहा (महार, चांभार) या जाती मातंग देवीच्या उपासक आहेत. ज्याप्रमाणे देवदासी, जोगतिणी रेणुका, यल्लम्मा देवीला वाहिल्या जातात. त्याचप्रमाणे मादिगा व परिहा जातीतील कुमारी मुलींना मातंगी देवीच्या उपासनेची दीक्षा दिली जाते. देवदासींच्या विवाहविधीसारखाच हा एक प्रकार असतो.

मातंगीची कथाही प्रचलित आहे. ज्यावेळी परशुरामाने आपल्या मातेचा शिरच्छेद केला तेव्हा त्याने पित्याला आईला जिवंत करण्याचा वर मागितला. त्यावेळी जगदग्नीने सांगितले की, 'तुझ्या आईचे वर उडालेले शीर शोधून ते या धडावर ठेव म्हणजे ती जिवंत होईल' परशुरामाने आईच्या शीराचा खूप शोध घेतला पण त्याला ते शीर सापडले नाही. शेवटी निराश होऊन परतत असताना त्याला आपल्या आईसारखीच दिसणारी एक मांगीण आढळली. त्याने अगतिकतेने त्या मांगीणीचे शीर कापून घेऊन ते आईच्या धडावर ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी जमदग्नीने त्याला विरोध केला. मग जमदग्नीने रेणुकेचे शीर स्वशक्तीने आणवून तिला जिवंत केले. आपली आई जिवंत करण्याच्या प्रयत्नात ती मांगीण मात्र व्यर्थ मेली, याची परशुरामाला खंत वाटली. त्याने आपल्या आईच्याच प्रतिष्ठेने त्या मांगीणीच्या शीराची माहूरगडावर स्थापना केली आणि रेणुकेंचे भक्त रेणुका दर्शनापूर्वी तुझे दर्शन घेतील, रेणुकेला नैवेद्य दाखविण्यापूर्वी तुला नैवेद्य दाखवतील असे वचन मांगीणीला दिले. माहूरगडावर आद्यपूजेचा मान पावलेली हीच ती मांतगी देवी होय. अशी कथा सांगितली जाते.[१२]

रेणुका देवीलाच मातंगी मानले जाते. आज रेणुकेची अदिती, एकवीरा, यल्लम्मा, जोगंळुबा, मातंगी, मरिअम्मा या नावाने पूजा केली जाते.[१३] सौंदत्ती येथे जोगुळबाई देवी आहे. ही मातंगी देवीचेच दुसरे नाव आहे. माहूरगडावर जी देवी रेणुका या नावाने अधिष्ठित झालेली आहे तीच मातंगी देवी आहे तसेच महाराष्ट्रातील मरिआई देखील मातंगीच असावी असे दिसते.[१४] 'धरणीचे पूत' म्हणविणारे महार ज्या मरिआईचे उपासक आहेत. ती मरिआईच धरणीदेवी आहे. ती जिथे मातंगी या नावाने नांदते आहे तिथे तिचे पुजारी हे महारच (क्वचित मांगही) आहेत. महाराष्ट्रात पेरणीच्यावेळी मांगीणीची ओटी भरण्याची प्रथा आहे. हे ही या संदर्भात महत्वाचे आहे. माहूर, तुळजापूर, सौंदत्ती येथे मातंगीची जी ठाणी आहेत त्या ठिकाणी मांग-महार जातीचेच पुजारी आहेत. मातंगी देवीचे मुख्य निवासस्थान म्हणून मातापूर अथवा माहूर या क्षेत्राचा वारंवार उल्लेख येतो.[१५]

सौंदत्ती येथील मातंगी देवीला जोगुळबाई असे नाव असल्याचा उल्लेख तसेच आंध्र कर्नाटकात मातंगी देवीही रेणुकेशी कधी समरुपता तर कधी एकरुपता साधून आदिम काळापासून नांदत असल्याचे दिसते.[१६] याशिवाय आंध्र आणि कर्नाटकामध्ये मादिगा आणि परिहा या दोन मांग, महार जातीमध्ये मातंगी देवीच्या अनेक कथा प्रचलित असून तिलाच यल्लम्मा आणि रेणुका अशी पर्याय नामे वापरली जातात.

## मातंगी दीक्षाचे स्वरुप

मातंगी दीक्षा म्हणजे देवदासी, जोगतिणी यांच्याप्रमाणेच 'मातंगी देवीला' मानणाऱ्या मांग जातीच्या उपासकाचा वर्ग आहे. हा वर्ग आपल्या मुलींना मातंगी देवीच्या उपासनेची दीक्षा देतो. त्यानंतर ही दीक्षा धारण करणाऱ्या कुमारींना मातंगी अशीच संज्ञा वापरली जाते. मादिगा व परिहा या दोन मांग, महार जातीमध्ये मातंगीची चाल मोठया प्रमाणावर आहे.

ज्यावेळी त्या समाजातील मुलींना मातंगीची दीक्षा दिली जाते. त्यावेळी ती कुमारी ही साक्षात् मानवरुपिणी मातंगी देवीच आहे, अशी मादिगांची व अन्य जाती - जमातीतील भाविकांची श्रध्दा आहे. मातंगीदेवीची ही मानवी रुपातील प्रतिनिधी साधारणपणे पुढीलप्रकारे निवडली जाते.

एखाद्या खेडयात मातंगीची निवड करावयाची असेल, तर त्या खेडयातील सर्व अविवाहित मुलींना मातम्मा अथवा मातंगी देवीच्या मंदिरासमोर जमवतात. नंतर ढोलाच्या दणदणाटात देवीची गाणी म्हणतात आणि देवीने तिच्या इच्छेनुसार एका कुमारीच्या ठायी अवतरावे, म्हणून देवीची प्रार्थना करतात. या आवाहनानंतर थोडयाच वेळात एखादी कुमारी देवी अंगात आल्याच्या जाणिवेने घुमू लागते आणि गावातले लोक समजतात की, देवीने आपले माध्यम निवडले आहे. पण एवढयावर भागत नाही. देवीने निवडलेल्या या कुमारीला आणखी काही दिव्यांतून जावे लागते. जमिनीवर रांगोळी काढून त्यावर कुमारीला बसवतात. तिच्या आसनाजवळ एक दहयाचे भांडे भरुन ठेवतात. अंगात आलेले असतानाही स्वत:ला सावरीत ती कुमारी आपल्या इष्ट आसनावर बसते. तिच्या भोवती, अगदी जवळ आणखी चार दहयांची भांडी असतात. त्या भांडयांना दोऱ्या बांधून दोऱ्यांची दुसरी टोके वर छपराला बांधतात. दोऱ्यांनी बांधलेल्या या दहयांच्या भांडयामध्ये बसलेली कुमारी देवीच्या संचारामुळे घुमत असतानाही, जर दहयाला धक्का न लावता संचार करु शकली तरच ती मातंगी दीक्षेच्या कसोटीला उतरली आहे असे समजतात. या कसोटीला उतरलेल्या कुमारीला टोपली, नागकाष्ठ (नागफणीची काठी), लिंबाच्या डहाळयांचा गुच्छ व कवडया गुंफलेली दोरी ही मातंगीची लांछने अर्पण करतात. ती लांछने प्राप्त झाल्यानंतर त्या कुमारीला मातंगी देवीचे प्रतिनिधित्व करण्याची प्रतिष्ठा प्राप्त होते. ती साक्षात् मातंगी देवी म्हणून मादिगा समाजामध्ये परमादराचा विषय बनते. लोक तिची देवी म्हणून संभावना करतात.[१७]

बऱ्याचवेळा मातंगी दीक्षेमध्ये काही कुमारिका जाणून-बुजून दीक्षा समारंभाशिवायही अंगामध्ये देवी संचारल्याच्या भावनेने घुमू लागतात, डोलू लागतात. मग मादिगा समाजातील ही मातंग मंडळी तिला मातंगीची लांछने अर्पण करतात.

मातंगी दीक्षेचा आणखी एक प्रकार रुढ आहे. मातंगी दीक्षेसाठी एखादे वारुळ शोधतात, ते वारुळ खणून त्यात दीक्षेच्छु कुमारीला बसवतात. तिच्या डोक्यावर एक टोपली पालथी घालतात. मग गायक मंडळी मातंगी देवीच्या आणि पूर्वी होऊन गेलेल्या मातंगी उपासिकांच्या लीळा वाद्यांच्या साथीने गाऊ लागतात. हे लीळागायन चालू असतानाच त्या 'वारुळस्थ' कुमारीच्या अंगात देवीचा संचार होतो आणि ती अत्यंत आवेगाने डोक्यावरील टोपली दूर उडवून वारुळाबाहेर येते.[१८] हे देवीचे अवतरण मादिगा लोक मोठया श्रध्देने मान्य करतात आणि त्या कुमारीला नागकाष्ठादी लांछने धारण करण्यासाठी देतात. मातंगी दीक्षेचा हा प्रकार विशेष महत्वाचा मानायला हवा कारण वारुळ हे मातंगीचे मूळ प्रतीक आहे.

मातंगी दीक्षेचा आणखी एक विधी आढळतो. कुर्नूल जिल्हयात कुंबमजवळ मलिंथपडु या गावी मातंगीच्या अथवा यल्लमा देवीच्या उपासनेचे एक ठाणे आहे. तेथे मातंगी कुमारिका दूरदूरच्या गावाहून स्वखर्चाने येतात. सर्व मातंगी कुमारिकांना यल्लमा देवीपुढे रांगेने बसवतात व नंतर एक ब्राम्हण देवीच्या मुखावरील पवित्र चिन्हांप्रमाणे सर्व मातंगी कुमारिकांच्या मुखावर चिन्हे काढतो. त्यानंतर देवीला रेडा बळी दिला जातो.[१९] हा विधी पाच दिवस चालतो सर्व यथासांग पार पाडल्यानंतर देवीचे प्राणतत्त्व त्या सर्व मातंगीच्या ठायी पूर्णपणे संक्रमित झाले आहे असे मानतात. मातंगी दीक्षा स्वीकारल्यानंतर प्रत्येक मातंगी कुमारीचे वृक्षाशी लग्न लावले जाते आणि या प्रतीकात्मक लग्न विधीनंतर मातंगी ही कोणत्याही पुरुषांशी शारीरिक संबंध ठेवू शकते. पण तरीही त्यामुळे ती अप्रतिष्ठित राहत नाही. तिने कोणाशीही संबंध ठेवला तरी तिला एका मातंगी देवी सारखेच प्रतिष्ठित स्थान मिळते.

अशाप्रकारे मातंगी दीक्षाविधी हा देवदासी विवाह विधीसारखाच असल्याचे दिसून येते.

## देवदासी / मुरळयांची प्रतीके

कोणत्याही धर्म अथवा पंथात काही वस्तूंना फार पवित्र मानण्यात येते. यामागे त्यांच्या श्रध्दा असतात किंवा त्या वस्तूंचा वापर त्या धर्मपंथातील देव किंवा विभूतींच्या आधाराने केला जातो. त्यामुळे त्या वस्तूबद्दल पवित्र भावना असते. त्याचप्रमाणे प्रत्येक देवदासीला आपण देवदासी असल्याचे सर्व

लोकांना समजावे म्हणून त्यांना रेणुका (यल्लम्मा) देवीची काही प्रतीके जवळ बाळगावी लागतात. ही प्रतीके जवळ ठेवण्यामागे त्यांच्या श्रध्दा, भावना असतात शिवाय ही प्रतीके धारण केल्याशिवाय जोगवा मागता येत नाही अशी श्रध्दा देवदासी स्त्रियांमध्ये असते. ही प्रतीके अनुक्रमे जग, परडी, चौरी-चामर, रत्या, चौंडक, तुणतुणे, टाळ, चाळ, भंडारा पिशवी, दर्शन, कवडयांची माळ, घोळ इ. होत. खंडोबाच्या मुरळयांना देखील खंडोबाची प्रतीके म्हणून यातील काही वस्तू जवळ धारण कराव्या लागतात.

१) **जग** - देवीला सोडलेल्या मुलीला (देवदासी) हा जग आपल्या डोक्यावर घेऊन जोगवा मागावा लागतो. जग आकाराने मोठा असतो. बाबूंच्या वेळांनी तयार केलेला गोल आकाराचा असतो. हा जग देवीचा पितळी मुखवटा, मोरांची पिसे, कवडयांची माळ, आरसे, व चोळीच्या खणांनी सजविलेला असतो. हा जग ज्येष्ठ देवदासींच्या, जोगतिणींच्या डोक्यावरच असतो. जिच्या डोक्यावर हा जग असतो तिला गुरुस्थानी मानले जाते. तोच प्रकार जोगत्यांमध्येही प्रचलित आहे.[२०]

२) **परडी** - परडी म्हणजे बांबूच्या वेळापासून बनविलेली गोल टोपली ही परडी एक मोठी असते, तर एक लहान असते. मोठी परडी ही यल्लमाची तर लहान परडी ही परशुरामाची प्रतीके मानली जातात. परडी रंगीत कपडा, आरसे, कवडया, देवीची मुखवटे, मोरपिसे यांनी सजविलेली असते. ती परडी आणि जग डोक्यावर घेऊन देवदासी, जोगतिणी गावांमध्ये जोगवा मागतात.

३) **दर्शन** - 'दर्शन' म्हणजे चिनीमातीच्या पांढऱ्या, तांबडया मण्यांची माळ. ते दर्शन देवदासींच्या गळयात मंगळसूत्राप्रमाणे नेहमी बांधलेले असते. ती परंपरा घराण्यात कायम चालविली जाते. आईनंतर मुलगी, सासूनंतर सून यांनी ती प्रथा चालविली पाहिजे असा नियम असतो.[२१] ज्यावेळी देवदासींचा विवाहविधी होतो त्याचवेळी तिच्या गळयांमध्ये हे दर्शन बांधले जाते. प्रत्येक जोगतिण मरतेवेळी आपले दर्शन आपल्या पाठीमागे एखादया मुलींच्या गळयात घालूनच मरत असते. त्याशिवाय तिला मोक्ष मिळत नाही. अशी त्यांच्यात कल्पना असते.

४) **तुणतुणे** - तुणतुणे हे एक तंतुवाद्य असून त्याचा आवाज तुणतुण निघतो. लाकडी वितभर व्यासाच्या पोकळ लाकडी भांड्याला एका बाजूने कातडे मढविलेले असते. लाकडी भांड्याला बांबूची तिरकस दांडी बसविलेली असते व तिच्या टोकाशी खुंटया असतात. कातड्याच्या मध्यातून तार ओढून ती दांडीच्या वरच्या टोकला, खुंटीला गुंडाळतात. सोयीनुसार ती तार खुंटी पिळून ताणता येते. कधी कधी

एकाच हातात हे वाद्य धरुन त्याच हाताच्या बोटाने हे वाद्य वाजवता येते तर कधी ते उजव्या हातातील काडीने आघात करुनही वाजविता येते. तमासगीर, गोंधळी, शाहीर इ. मंडळी हे वाद्य वाजवतात. दक्षिणेत याला ' तुंतिण' म्हणतात. यल्लम्मा देवीचे उपासकांच्या हातातही तुणतुणे असते. परंतु प्रत्यक्षात यल्लम्माचे भक्त तुणतुण्याला 'सुती' ही म्हणतात.

५) **भंडारा पिशवी** - हळदीचा भंडारा ठेवण्याची पिशवी ही अतिशय पवित्र मानली जाते. जोगवा मागताना दान देणाऱ्याच्या कपाळी भंडारा लावला जातो. एखादी मुलगी किंवा मुलगा आजारी असला आणि त्याचे पालक अंधश्रध्देमुळे ज्येष्ठ जोगतिणीकडे गेले तर ती ज्येष्ठ जोगतिण त्या अपत्याच्या अंगावर भंडारा टाकण्याचे सुचवते. भंडारा टाकणे याचा अर्थ केव्हातरी पुढे त्या मुलीला वा मुलाला देवाला वहावयालाच हवे. कारण देवीने त्याला / तिला वाचविलेले असते.'येल्लू तुझी महिमा मोठी / चला घेऊ भंडार वाटी ' अशी एक ओळ एका देवदासी गीतात आढळते.[२२] ज्यावेळी सौंदतीला रेणुका देवीची यात्रा सुरु होते. त्यावेळी त्या यात्रेत हा भंडारा खोबऱ्याच्या वाटीचा व सुट्या पैश्यांचा खुर्दा करुन उधळला जातो. यामागचे कारण म्हणजे जमदग्नी ऋषी (रेणुकेचा पती) पूजेला बसत त्यावेळी रेणुका ही मानस सरोवरातली फुले तोडून आणीत असत. त्यात पिवळ्या फुलांचाही समावेश असायचा. म्हणून या पिवळ्या रंगाच्या फुलांचे व पिवळ्या रंगाच्या भंडाऱ्याचे विशेष महत्व मानले जाते.

६) **रत्या** - जगाच्या भोवती अंतराअंतराने पितळेच्या चकाकणाऱ्या रत्या बसविलेल्या असतात. जग, जगातील मुखवटा उठून दिसण्यासाठी या रत्या जगाला अडकविलेल्या असतात. त्या फक्त जगालाच लावता येतात. परडीला लावता येत नाहीत. कारण परडी आकाराने जगापेक्षा खूपच लहान असते.

७) **चौंडकं** - हे एक पवित्र वाद्य मानले जाते. रेणुका कथेतील निरनिराळ्या भागात या चौंडकाबाबत कथा आहेत. कार्तवीर्याचा वध करुन त्याच्या कवटीपासून आणि आतड्यापासून हे चौंडकं बनवले असेही समजले जाते. या चौंडकांचा उपयोग मेळ्यात, ताफ्यात वाद्य म्हणून करतात. याचा आवाज निरनिराळ्या प्रकारे काढला जातो. वाजविणारा कुशल असेल तर तो फारच खुबीने वाजवतो. प्रामुख्याने जोगता हे वाद्य वाजवतो. त्याला चौंडक्याही म्हणतात.[२३] हे चौंडकं वाद्य लाकडाचा गोल खोका, हरणाचे कातडे, बांबूचा दांडा आणि तार या वस्तूंपासून बनविले जाते.

८) **चौरी-चामर** :- देवांवर छत्र-चामरे ढाळण्याची प्रथा प्रारंभापासून दिसते. यल्लम्माच्या देवदासी तिबेटी बैलांचे शेपूट ' चौरी' म्हणून वापरीत. आता मात्र धातूचे हॅण्डल बसविलेली आणि कोणत्याही प्राण्यांच्या केसांची 'चौरी' बनवितात. ती घरच्या देव्हाऱ्यात अडकवून ठेवलेली असते. तिची पूजा केली जाते. ती घराबाहेर नेली जात नाही.[२४] देवाच्या मूर्तींना चौरीने वारा घालतात. ही चौरीसुध्दा ज्येष्ठ, वयस्क जोगतिणीच्यांच खांद्यावर असते.

९) **चाळ आणि टाळ** - चाळ म्हणजे काश्यांच्या धातूपासून बनविलेली लहान आकाराची घुंगराची माळ. मुरळया किंवा देवदासी आपल्या पायात चाळ बांधून गाणी म्हणतात. काहीवेळेला जोगवा मागतानाही त्यांच्या पायामध्ये चाळ बांधलेला असतो. तर भक्तलोक देवाचे भजन व आरती म्हणताना टाळ, वाजवितात. टाळ म्हणजे काश्यांच्याच धातूपासून बनविलेल्या लहान आकाराच्या दोन गोल वस्तू होय. जोगतिणी जोगवा मागताना टाळ वाजवून, गाणी म्हणत जोगवा मागतात.[२५]

१०) **कवड्यांची माळ** - महाराष्ट्रामध्ये व कर्नाटकामध्ये रेणुका, यल्लम्मा, मातंगी, मरिआई, भवानी, महालक्ष्मी इत्यादी नावांनी गाजलेल्या देवींच्या उपासना क्षेत्रात कवडीचे असाधारण महत्व आहे. गोंधळी, भृत्ये, पोतराज, मुरळ्या, देवदासी, जोगतिणी, मातंगी, जोगती हे देवीचे उपासक आपल्या अंगाखांद्यावर कवड्यांचे नाना प्रकारचे दागिने परिधान करतात. गोंधळ्यांच्या, वाघ्यामुरळ्यांच्या, जोगतिणींच्या, देवदासींच्या गळ्यात कवड्यांच्या माळा असतात. देवदासी, जोगतिणींच्या जगांना कवड्या गुंफलेल्या असतात. काखेत अडकवलेल्या भंडाऱ्याच्या पिशव्यांनाही कवडया लावलेल्या असतात. मातंगीच्या परड्या या कवडयांनी सजविलेल्या असतात. कवड्यांची माळ ही मुरळी, जोगतिण व देवदासींची लांछने आहेत. याशिवाय एका कथेमध्ये यल्लम्मा देवीने एका अपराध्याच्या अंगावर कवडीच्या माळेतला भंडारा काढून टाकताच त्याच्या अंगाचा दाह झाला असे एका जोगतिणीच्या कथा गीतेत म्हटले आहे.

कवडीच्या माळेतला भंडार काढिला ।
त्याच्या अंगावरती झोकला ।
आगिन जडली त्याच्या अंगाला ॥[२६]

स्त्री योनी आकाराची मोठ्या पांढऱ्या मण्यांची माळ म्हणजेच कवडयांची माळ, जोगवा मागताना देवदासी, जोगतिणी किंवा मुरळ्या आपल्या गळ्यांमध्ये घालतात. यल्लम्मा देवीला कवड्यांचा शिणगार प्रिय असतो असे मानले जाते.

११) <u>घोळ</u> :- काश्यांच्या धातूपासून किंवा क्वचितच पितळेच्या धातूपासून बनविलेल्या घंटीच्या आकाराच्या दोन लहान वस्तू म्हणजे घोळ होय. ज्यावेळी लग्न घरांमध्ये जागरणाचा कार्यक्रम असतो, त्यावेळी मुरळी हातांमध्ये घोळ घेऊन जागरणाचा कार्यक्रमात नृत्य करते. तर वाघ्या तिला आपल्या डफांवर साथ देतो. मुरळ्यांना घोळाशिवाय जागरणात नृत्य करता येत नाही. काही ठिकाणी घोळला ' घाटीही' म्हणतात. ज्यावेळी मुरळ्यांचे खंडोबाबरोबर किंवा त्याच्या खंजीराबरोबर लग्न लावले जाते. त्यावेळी हा घोळ मुरळी प्रथेचे प्रतीक म्हणून तिला अर्पण केला जातो. मुरळीचे एकदा खंडोबाबरोबर लग्न लागल्यानंतर तिला खंडोबाच्या गाभाऱ्यात प्रवेश नसतो. ती फक्त मंदिरात किंवा बाहेर उभे राहूनच त्याचे दर्शन घेते. मुरळीही गळ्यांत तांबडया / पांढऱ्या मण्यांची माळ घालते. पण तिला पायांमध्ये जोडवी घालता येत नाही. कारण तसा त्यांच्या प्रथेमध्ये नियम आहे.[२७]

एकंदरीत या ११ वस्तू यल्लम्मा व खंडोबा देवतांची पवित्र चिन्हे मानली जातात. मुरळी व देवदासी होणाऱ्या स्त्रीला ही प्रतीके / पवित्र चिन्हे धारण करावीच लागतात. परडी आणि कवड्यांची माळ ही देवदासींची तर घोळ, कोटंबा (भिक्षापात्र लाकडाचे), गांठा (रुप्याचा गोफ), दिवटी, बुधली ही वाघ्या मुरळ्यांची लांछने समजली जातात. दर्शन आणि हातात परडी घेऊन व काखेत भंडाऱ्यांची पिशवी घेऊन देवदासी उदे s उदेs उदे ग आई उदे s उदे ss करीत यल्लम्मा, रेणुकेची गाणी म्हणत जोगवा मागतात. तर मुरळ्या भंडाऱ्याची पिशवी, परडी घेऊन, ' येळकोट, येळकोट जयमल्हार ' असा गजर करत खंडोबाची गाणी म्हणत जोगवा मागतात.

ही रेणुका देवीची प्रतीके देवदासी / जोगतिणींना दर मंगळवारी, शुक्रवारी, चैत्र पौर्णिमेला व माघी पौर्णिमेला आपल्या घरांमध्ये पुजावी लागतात. इतरवेळी या वस्तू देव्हाऱ्यांमध्ये ठेवतात.

## <u>देवदासींशी निगडीत अन्य काही प्रथा - परंपरा</u>

देवदासी स्त्रियांना इतर काही प्रथा, परंपराही स्वीकाराव्या लागतात. त्यामध्ये आंबिल यात्रा, परडी भरणे, जोगवा मागणे, लिंब नेसणे इ. प्रथांचा उल्लेख केला जातो. या प्रथा अशा -

१) **आंबिल यात्रा** - ज्यावेळी मुलीला रेणुका देवीला देवदासी म्हणून सोडले जाते. त्यावेळी यात्रा करुन आल्यावर आंबिल यात्रेचा विधी केला जातो. साधारणत: आसपासच्या मोठ्या गावी किंवा यात्रेकरुंची संख्या जास्त असलेल्या गावी आंबिल यात्रा भरते. चैत्र पौर्णिमेनंतरच्या मंगळवारी व शुक्रवारी ही यात्रा भरते. ही यात्रा झाल्याखेरीज यात्रेकरुंना यात्रेचे पुण्य लाभत नाही. जे लोक प्रत्यक्ष डोंगराला गेलेले नसतात. त्यांनाही या यात्रेत सहभागी होऊन डोंगराला न जाताच त्याचे पुण्य पदरात पाडून घेता येते. [२८]

आंबिल यात्रेमध्ये यल्लमाच्या पूजा, आरतीबरोबरच परड्या भरण्याचा व त्या पूजनाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होतो. निरनिराळ्या जातीच्या देवदासी तेथे जमा होतात. त्यात पहिला मान हा मातंगीला असतो. पारंपारीक वाद्याच्या तालावर देवदासींच्या अंगात येऊन गावातून मुख्य देवळापर्यंत वाजत गाजत मिरवणूक काढली जाते. ज्येष्ठ जोगतिणींच्या घरासमोर मोठा मंडप उभा केला जातो. रात्री रेणुका देवीच्या जन्म कथेचे आख्यान ठेवले जाते. यावेळी परगावच्या देवदासी पाहुण्या म्हणून निमंत्रित केल्या जातात. [२९]

२) **लिंब नेसणे** :- सामान्यत: प्रत्येक शुभकार्यासाठी लिंब नेसण्याची, नेसविण्याची प्रथा असते. ज्या घराचे कुलदैवत यल्लम्मा असते त्या घरातील स्त्रिया लिंब नेसतात. काही घराण्यांमध्ये देवदासी स्त्रीला घरी बोलावून तिच्यांकडून लिंब नेसविला जातो. लिंब नेसण्यापूर्वी एखादया अंथरुणावर किंवा घोंगडयावर तांदळाच्या चार रेषा मारल्या जातात व त्यावर पाच जग ठेवले जातात हे जग दोऱ्याने गुंतविल्याले असतात त्यावर प्रसाद ठेवला जातो. मग त्या जगांना पाच प्रदक्षिणा घातल्या जातात.

लिंब नेसण्याची प्रथा सौंदत्तीच्या यात्रेतही आढळते. 'सौंदत्तीच्या उरगोळ डोंगराच्या पायथ्याजवळून मलप्रभा नदी वाहते.त्या नदीच्या तीरावर 'कुंकमहोंड, अरिषणहोंड, येणेहोंड, मनोळीहोंड, व जुगूळहोंड' (होंड म्हणजे तीर्थस्थान होय) आहेत. यात्रेकरु प्रथम त्या तीर्थकुंडात अंघोळ करतात मग यल्लम्माच्या दर्शनाला जातात. ज्या स्त्रियांना नवस फेडावयाचे असते किंवा ज्या मुलींना देवदासी सोडायचे असते. त्या स्त्रियां नग्न होतात कमरेला लिबांच्या डहाळया बांधतात तोंडात एक डहाळी धरतात आणि यात्रेकरु बरोबर 'उदे ss ग आई उदे sss... असा घुत्कार घालीत मनोळी ते यल्लम्माच्या देवळापर्यंत चालत जातात. तर काही जुगुळकुडांत अंघोळ करुन व लिंब नेसून देवीच्या देवळांपर्यंत ३ किलोमीटर अंतर दंडवत घालत जातात. [३०] या स्त्रिया लिंबाची डहाळी तोंडामध्ये धरुन जात असतात. ती खाली पडता कामा नये असा त्यांच्यात दंडक असतो.

रेणुका महात्म्यामध्ये लिंब नेसण्याची संबंधी एक कथा आढळते, त्यावरुन लिंब नेसण्या मागच्या कारणाचा अंदाज करता येतो. ' परशुरामाने पृथ्वी नि:क्षत्रीय केली तेव्हा शरणार्थींना परशुरामाने संरक्षण दिले. जोगीनाथ तीर्थाला जा, अंघोळ करुन लिंब नेसा, व रेणुकेची पूजा करा असे सांगितले. मग रेणुकेने प्रसन्न होऊन भंडारा लावायला, जोगवाही मागायला सांगितला तसेच जोगव्यातील काही भाग गरीबांना दयायला सांगितला.[३१] यातूनच लिंब नेसण्याची प्रथा सुरु झाली असावी. आज कायद्याने नग्न होऊन लिंब नेसण्याच्या प्रथेवर बंदी घातली आहे. तरीदेखील सध्या स्त्रिया कपडयांवर लिंब बांधताना दिसून येतात.

३) **परडया भरणे** - परडया भरण्याची प्रथा देवदासी, जोगतिणीशी आहे ज्या देवदासीला लिंब नेसणे खर्चिक दृष्टया परवडत नाही त्या नुसत्याच पाच जोगतिणी बोलावून परडया भरतात, जवळपासच्या देवळांस पाच प्रदक्षिणा घालून प्रत्येक परडीत पाच फळांचा नैवैद्य टाकून पाच जोगतिर्णीना जेवायला घालून सन्मानाने पाठविले जाते अशा विधीला पुरणपोळया केल्या जातात.[३२]

ज्यावेळी देवदासींचा विवाहविधी होतो त्यावेळी उपस्थित जोगत्या, जोगतिर्णींच्या परड्या पुजून त्यांना चोळी बांगड्याचा आहेर केला जातो व त्यांच्याकडून एक परडी नवीन देवदासी स्त्री स्वीकारते. त्यानंतर ती ' अकुंदी' म्हणत मंगळवार, शुक्रवार जोगवा मागते. या परड्या घेऊनच देवदासींना डोंगराला जावे लागते, तसा त्यांच्यात नियम असतो.

४) **जोगवा मागणे** :- प्रत्येक देवदासीला मंगळवार आणि शुक्रवार या रेणुका देवींच्या वारांदिवशी किमान ५ घरे तरी जोगवा मागावा लागतो. पूर्वी मागासलेल्या देवदासींना पाच गावे जोगवा मागायला लावले जात होते. त्यामागे धार्मिक भाग कमी असून तिची सभोवतीच्या गावात माहिती व्हावी व ती असलेल्या ताफ्याला जास्तीत जास्त निमंत्रणे मिळावीत हा हेतू संभवतो. जोगव्यात पैसे व धान्यही मिळते. मुळात पाच घरे जोगवा मागून धार्मिक जीवन देवदासीने जगावे हा हेतू होता तो परिस्थिती आणि कालमानाने मागे पडला असावा. आसपासची पाच गावे मागण्याची प्रथा निर्माण झाली असावी.[३३]

याशिवाय काही देवदासींचा जोगवा मागण्यामागे हेतू वेगळा असतो. कारण जोगवा मागण्याच्या पध्दतीत तांदूळ, गहू, ज्वारी, सर्व पिठे, पैसे, कपडे, चोळीचे खण अशा प्रकारची कमाई असते. स्वत: बरोबरच कुटुंबाचे पोट भरण्याचे एक साधन म्हणून त्या जोगव्याकडे पाहतात. ज्यांची परिस्थिती चांगली आहे त्या मांगाच्या कुंडाची पूजा करुन, पाच घरे जोगवा मागतात. पण ज्या गरीब देवदासी असतात त्या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

उदरनिर्वाहासाठी कधीही जोगवा मागतात व जोगव्यांमध्ये मिळणाऱ्या धान्यांवर, पैशांवर आपली गुजरण करीत असतात ही देखील वस्तुस्थिती आहे.

५) **<u>मेळा - ताफा</u>** - एकाच गावच्या परंतु वेगवेगळया जातीतील जोगत्यांचा समावेश असलेला एक संच त्याला मेळा किंवा ताफा म्हणतात. सुगी हंगामाला हा मेळा गावोगावी यल्लम्माची आख्याने सांगत दिवसभर जोगवा मागणे, रात्री गावातील प्रतिष्ठित धनदांडग्या, पाटील व ईनामदारांच्या घरी यल्लम्मा (रेणुका) ची कथा भारुड पध्दतीने (सोंगी नव्हे) कथन करणे इत्यादी कामे करीत असतो. या ताफ्यात, निरनिराळया गावाच्या देवदासींचा सहभाग असतो. हा मेळा, पंधरवडा किंवा महिन्याच्या दौऱ्यावर असतो. सुगी हंगामामध्ये या मेळाव्याचा बराच फायदा होतो यात पैसा, कपडे, धान्य भरपूर प्रमाणात मिळते.[३४] या धान्य, पैशांवरच मेळाव्यांतील देवदासींची गुजरण होत असते. काहीवेळा देवदासी आपल्या ताफ्याला जास्तीत जास्त निमंत्रणे यावीत या हेतूने पाच-पाच गावे जोगवा मागताना दिसून येतात.

६) **<u>यात्रा - (अहेव व रांड पुनव)</u>** - देवदासी प्रथेमध्ये अहेव व रांड या दोन पौर्णिमेला अतिशय महत्वाचे स्थान आहे. सौंदत्तीच्या चैत्री आणि माघी पौर्णिमेला येणाऱ्या यात्रानांही महत्वांचे स्थान आहे. माघी पौर्णिमा ही रांड पुनव तर चैत्र पौर्णिमा ही अहेव पुनव मानली जाते. रांड पुनवेपासूनचा काळ हा वैधव्याचा काळ असतो, कारण कार्तवीर्याने जमदग्नीचा वध केल्याचा हा काळ होता. या काळात रेणुकादेवी विधवा झाली होती. म्हणून जोगतिणी आपल्या हातातील बांगडया फोडून पेटवलेल्या कुंडात टाकतात. मात्र चार महिन्याने पुन्हा चैत्र पौर्णिमा म्हणजे अहेव पुनव येथे त्यावेळी त्या पुन्हा हातात हिरवा चुडा भरतात. मधल्या चार महिन्याचा काळ सध्या या देवदासींनी चार दिवसांवर आणला आहे.[३५] जोगतिर्णींना हातांमध्ये हिरवा चुडा जोगव्यातून आलेल्या पैशांमधूनच भरावा लागतो. तसा त्यांच्या प्रथेमध्ये रिवाज आहे. अशाप्रकारे ज्यावेळी माघी पौर्णिमा येते त्यावेळी देवदासी / जोगतिणी विधवा होतात व चैत्र पौर्णिमेला त्या सुवासिनी होतात असे मानले जाते.

७) **<u>झुलवा लावणे</u>** - देवदासींची दीक्षा दिल्यानंतर त्या मुलीचा भोग घेण्यासाठी गावातील प्रतिष्ठित धनिकांमध्ये चढाओढ लागते. ते तिला पैसा देऊन तिचा भोग घेतात, तर काहीजण तिला आपली रखेली म्हणून ठेवतात. दलित समाजातील एखादा सुखवस्तू पुरुष त्याची पहिली पत्नी असूनही देवदासीबरोबर झुलवा लावतो. तिला दुसरीकडे स्वतंत्र घर करुन ठेवतो. झुलवा म्हणजे पुर्नविवाहाचा एक प्रकार आहे.

झुलवा लावल्यानंतर ती देवदासी त्याच्या बरोबर पत्नी म्हणून सारे जीवन घालविते. परंतु समाजात तिला लग्नाच्या पत्नीसारखा दर्जा नसतो. ती केवळ त्याच्या रखेलीसारखेच राहते. झुलव्यापासून तिला मुले होतात पण त्या मुलांचा बाप म्हणून त्याचे नाव गावच्या रेकॉर्डला न लावता आईचेच नाव लावले जाते. त्यामुळे ती मुले झुलवा लावणाऱ्याच्या इस्टेटीत कायदेशीर वारस ठरत नाही. ती बेवारशीच राहतात आणि 'बेवारशी मुले' म्हणून समाजात उपेक्षित जीवन जगतात.[३६]

झुलवा लावण्याच्या दिवशी दिवसभर धार्मिक विधी होतो. रात्री गाव जेवण असते हा सर्व खर्च धनिकच करत असतो. झुलवा लावण्यासाठी घातलेल्या मांडवात तो देवदासीला मांडीवर घेऊन मंचावर बसतो. त्या दिवसापासून ती देवदासी त्या धनिकाची झाली असे मानले जाते. या विधीला केवळ धार्मिक आधार आहे. देवदासीला आयुष्यभर पोसलेच पाहिजे असे कायदेशीर बंधन धनिकांवर नसते. जोगतिणीने ज्या माणसांबरोबर झुलवा लावला त्याच माणसांबरोबर शरीर संबंध ठेवावेत असा संकेत असतो. देवदासींच्या बाजूने हा झुलवा मोडताही येतो. पिपाण्या लावून, संबळ लावून एक वरात काढली जाते अशी वरात एखादया देवदासीने काढणे म्हणजे झुलवा मोडण्याचाच प्रकार असतो. याचा अर्थ आता ती इतर लोकांच्याबरोबर 'बसायला' मोकळी झाली असा असतो. कधी कधी झुलवा लावलेल्या देवदासीला लेकवळा झाला तर तिला झुलवा तिच्या मुलांसकट हाकलून देतो, कारण त्या मागेही विधीबाहय आर्थिक जबाबदारी टाळण्याची प्रवृत्ती असते.[३७]

अशाप्रकारे झुलवा लावून घेतलेल्या पुरुषाने सोडून दिल्यावर देवदासी दुसऱ्या पुरुषांचा शोध घेते. कारण निव्वळ जोगवा मागून तिचे व तिच्या कुटुंबाचे पोट भरत नाही. आर्थिक आधार मिळविण्यासाठी हाच मार्ग तिच्या समोर उरलेला असतो. घरचे लोकही त्यासाठी तिला प्रवृत्त करतात. अशा प्रकारे देवांच्या सेवेसाठी सोडलेली देवदासी परिस्थितीच्या भोवऱ्यात अडकून 'भोगदासी' बनते. अखेर गाव सोडून वेश्याव्यवसायासाठी शहरातील लालदिव्यांच्या माडयांचा आश्रय घेते.[३८] परिस्थितीच्या तगादयामध्ये ती वेश्यावृत्ती स्वीकारते. अशातऱ्हेने आर्थिक कारणाने देवदासीला वेश्यावृत्ती स्वीकारावी लागत असली तरी त्याला धार्मिक, सामाजिक मान्यता दिलेली असल्याने या प्रथेत विकृती शिरल्याचे दिसते. आजही ही प्रथा सुरु राहण्यास आर्थिक कारण हेच महत्वाचे कारण आहे असे म्हणता येईल.

## देवाला सोडण्याच्या कारणांचे स्वरुप

प्राचीन काळापासून ते आजतागायत मुलींना देवदासी केले जाते. प्रामुख्याने रेणुका देवीला देवदासी व खंडोबा देवाला मुरळया वाहिल्या जातात. सर्वसाधारणपणे मुला- मुलींच्या केसामध्ये जट धरणे, मुला-मुलींना खरुज, नायटे, इसब असे त्वचारोग होणे, ते लवकर बरे न होणे, मुले-मुली आजारी पडणे, मुले न होणे, मुलीचे बाळंतपण व्यवस्थित न होणे, झालेच तर ते मूल न जगणे, घरात सुखशांती, समाधान नसणे, देवीचा नवस फेडणे, घराण्याची परंपरा पिढयान्पिढया टिकविणे इ. कारणांमुळे अज्ञानी धर्म भोळे लोक आपल्या मुलींना देवदासी किंवा मुरळया बनवतात. तसेच देवदासी सोडल्याने तिच्या कमाईवर गरीब कुटुंबाचा चरितार्थ चालतो त्यामुळे आर्थिक प्रश्न सुटतो. म्हणजे मुलींना देवदासी सोडण्यामागे जसे धार्मिक, सामाजिक, दैवी कारण आहे तसेच अर्थकारणही आहे.[३९]

देवदासी सोडण्यामागे जट येणे हे महत्वाचे कारण मानले जाते. जटेमध्ये बालपणाची जट, आजारपणामध्ये आलेली जट असे प्रकार असतात. जट म्हणजे काय? त्याचे स्वरुप काय ? तर अनेकदा मुलींच्या केसांना तेल पाणी नसते, वेणी फणी नसते, खेडयामध्ये अडाणी समाजात स्वच्छतेच्या नावाने सारा आनंदच असतो. मग केसांचा गुंता होतो. रोज केस नीट विंचरावेत, तेल लावावे, गुंता मोडून काढावा याची सवय नसते, असलेली सवय आजारपणाने सुटते. गुंता वाढत जातो, केस अडकून राहतात, त्यात घातलेली फणी पुढे सरकत नाही मग त्याचे कारण शोधले जाते.[४०] मग पोरीला यल्लू आईचे बोलावणे आले आहे असे गृहित लावून त्या मुलीला देवीला सोडण्यास भाग पाडले जाते.

खरे तर जट वगैरे तसे काहीच नसते केवळ अस्वच्छतेमुळे व दुर्लक्ष केल्यामुळे केसात गुंता वाढला जातो. काही लोक त्या जटेला तिळाचे तेल, वडाचा चिक, हळदी कुंकू लावून मुद्दाम जट धरल्याचे सांगून देवीच्या नावाने जोगवा मागतात. घरामध्ये कमालीचे दारिद्र असल्यामुळे बाल संगोपनाचे महत्व मुळीच माहित नसते आणि पोटाच्या मागे लागून मुलांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष होते. मुले नेहमीच मातीत खेळत असतात त्यातील धूळ, माती, केर कचरा दीर्घकाळ डोक्यामध्ये तसाच राहिल्याने गुंता तयार होतो. आधीच अंधश्रध्देकडे मन पंगू असल्याने या जटेवर लगेचच भंडारा टाकून मंगळवार, शुक्रवार देवीच्या नावाने त्या जटाधारी मुलींच्या धार्मिक विधीला सुरुवात होते. अगदी लहानपणी केसात जट धरल्यास त्या जटेला बाळ जट म्हणतात.[४१] पण बऱ्याच वेळेला या जटाकडे गरीब परिस्थितीमुळे गंभीरपणे पालक

मंडळी पाहत नाहीत. घरातील एखादी व्यक्ती जरी दीर्घ आजारी असेल तर तिला डॉक्टरांकडे घेऊन न जाता त्याच्या आजारपणाकडे धार्मिक दृष्टिकोनातून पाहिले जाते. मग त्या आजारी व्यक्तीला देवर्षीकडे नेले जाते. मग त्यातून उतारा, अंगारा, धुपारा, ताईत, गंडा-दोरा, कोंबडी कापणे, बकरी कापणे, उतारे टाकणे, नवस करणे इ. गोष्टी केल्या जातात. पण त्या रोगी, आजारी व्यक्तीच्यांकडे स्वच्छतेच्या दृष्टिने पाहिले जात नाही. त्यातूनच केसात जट तयार होतात नंतर केसात लिखा, ऊवा होऊन गंभीर जखमा होतात. काही रोगी व्यक्ती या जखमांमुळे मरतातही. त्यामुळे वेळच्या वेळी रोग्याच्या व्यक्तीगत स्वच्छतेकडे लक्ष न दिल्यामुळे भयानक अवस्था निर्माण होते. एकूणच अस्वच्छता, अज्ञान, दारिद्रय व अंधश्रध्दा यामुळे जट येण्यावर उपाय करण्याऐवजी देवदासी सोडण्याचा पर्याय शोधला जातो.

## देवदासींच्या शेंसविधीचे स्वरुप

गोवा, सावंतवाडी, मालवण, रत्नागिरी या शहरामध्ये असलेल्या भाविणी, नायकिणी यांचा शेंसविधी होतो. येथील मुलींना देवदासींची दीक्षा देण्याच्या विधीला शेंसविधी म्हणतात.

शेंसविधी अगदी बालपणी केला जातो. कधीकधी तर तो पाळण्यातच करण्यात येतो. 'शेंस' या शब्दाचा अर्थही लग्न असाच आहे. फरक इतकाच की सामान्य विवाह हा मुलगा व मुलगी यांचा होतो तर शेंसविधीत मुलीचे लग्न पुरुष वेषधारी मुलीशीच होते. या नवरा झालेल्या मुलीला पुरुषाचा सर्व पोषाख घातलेला असतो. अगदी पागोटेसुध्दा तिच्या डोक्यात घातलेले असते. हातात एक नारळ आणि एक सुरी किंवा खंजीर देतात. माळ घालण्याच्या वेळी शेंस घालण्यात येत असलेली मुलगी त्या पुरुषवेषधारी नवऱ्याच्या गळ्यात माळ न घालता त्याच्या हातातील नारळाला घालते. या शेंसरुपी लग्नातले अगदी बारीक सारीक विधिही करता यावेत म्हणूनच अशा नवऱ्याची जरुरी असते. नुसत्या नारळालाच माळ घालावयाची असली तर या तोतया नवऱ्याची मुळीच आवश्यकता नाही. पण वराच्या जागी एखादा मुलगा उभा न करता त्याचाच पोषाख घातलेली मुलगी उभी करण्याचा हेतू अगदी वेगळा असतो. तो हा की एवढे काम एखाद्या मुलाला करावयास सांगितले आणि त्याने पुढे या मुलीशी माझे विधीपूर्वक लग्न झाले आहे, ती माझी कायदेशीर बायको आहे, तिला माझ्या घरी पाठवा असे म्हटले तर साराच घोटाळा व्हावयाचा. असा हक्क कोणाला सांगता येऊ नये याकरिता नवरदेवाच्या जागी या पुरुषवेषधारी मुलीची योजना करण्यात येते. पण दु:खाची गोष्ट ही की, या शेंस घातलेल्या मुलीने अनीतिने वागावे असा या विधीत कोठेही उल्लेख नसतानाही हा विधी उरकला की ती मुलगी अनीतिचा धंदा करण्यास योग्य झाली

असे मानण्यात येते. इतकेच नव्हे तर हा विधी झाल्याशिवाय धंद्याला जर कोणी आपली मुलगी लावली तर ती गोष्ट धर्मबाह्य झाली असे मानून त्या घरावर बहिष्कार घालण्यात येतो. काही ठिकाणी हा विधी मुलींच्याच घरी करण्यात येतो. काही ठिकाणी तो देवळात करण्याची वहिवाट असते. या विधीला ताशेवाजंत्री, जेवणखाण वगैरे सारे लग्नाप्रमाणेच करावे लागत असल्यामुळे ती फार खर्चाची बाब असते. हा विधी झाल्याबद्दल देवळातून साडी पुतळी, नारळ असा काही तरी आहेरही मिळतो आणि हा विधी झाल्याशिवाय ती मुलगी देवळातील कामाला लायक ठरत नाही.[४२]

अशाप्रकारे, भाविणी, नायकिणी व एकूणच देवदासीचा शेंस विधी केला जातो. पण हा विधी झाल्यापासून त्या मुलीला आपण अनीतिची दीक्षा दिली अशी समजून करुन घेऊन त्या दृष्टीने तिच्या पूर्व तयारीला सुरवात होते. या विधीमुळे तिच्या आयुष्याची दिशा कायम ठरते. सर्व कुटुंबाचा भाग्योदय तिच्यावर अवलंबून असल्यामुळे घरातील माणसे तिचा अधिक लाड करतात. तिला मौल्यवान दागिने, उंची कपडे व श्रीमंती खाणे तिला सर्वांच्या आधी मिळते व एखाद्या धनाढ्याची रखेली होऊन तिचे आयुष्य सुखात कसे जाईल याकडे सर्वांचे लक्ष लागते. शिवाय एखाद्याने ठेवलेली म्हणून राहणे हाच तुझा धर्म असल्यामुळे तुला लग्न करता येत नाही असे सारखे तिला बजावण्यात येते. पण घरातील जेंव्हा मुलांमुलींमध्ये भेद केला जातो. तेंव्हा मात्र तिच्या अध:पतनाला सुरवात होते.

पुढे या स्त्रिया आपला धंदयाचा जम बसविण्यासाठी मुंबई गाठतात. या स्त्रियांना आपल्याकडे येणारा पुरुष सधन असावा वाटतो. कारण त्या पैशांशिवाय इतर कोणत्याही गोष्टीकडे पाहत नसतात. पण जी व्यक्ती सर्वात जास्त पैसे देते ती त्याची रखेल होते. परंतु असा इसम कायम ठरेपर्यंत तिचे आचरण चांगले राहण्याकरिता काळजी घेण्यात येते. पुढे ही मुलगी उपवर झाली ती गोष्ट जाहीर करतात. तिच्याशी प्रथम संबंध ठेवता यावा म्हणून काही लोकात चढाओढ लागलेली असते. यात अर्थातच जो अधिक पैसे देण्यास तयार होईल. त्यालाच शेवटी यश येते. शेवटी एक मोठा समारंभ करुन तिच्या धंदयाची सुरवात करुन देण्यात येते. या समारंभाला ' हात लावणी' असे म्हणतात. पण या माणसांची निवड करण्याचा अधिकार अर्थातच त्या मुलीला मुळीच नसतो. केवळ घरातील लोकांच्या आग्रहांवरुन तिला संबंध ठेवणे भाग पडते. मग तो रोगी असो वा निरोगी, तरणा असो, वा वृध्द असो. पहिले काही दिवस तिचे सुखात, चैनीत जातात. ती त्याच्याशीच फक्त संबंध ठेवत असल्याने त्या माणसांकडून तिला

काही पगारही मिळतो. एकाच व्यक्तीशी संबंध ठेवण्याची त्या मुलीची अपेक्षा असते. पण त्या पुरुषाला सतत एकाच मुलीची संगती नको असते. मग लवकरच तो तिला सोडतो. त्यामुळे तिला दुसरा पुरुष शोधावा लागतो. या नवीन माणसाकडून पगारही कमी प्रमाणात मिळत असल्याने या माणसांमध्ये वरचेवर बदली होतात. त्यातूनच तिला अनीतिजन्य रोगांची लागण लागते. औषधानेही गुण येत नाही. मग हवापालट करण्यासाठी गावी जाते. पण त्यामुळे येणारा पगार बंद होतो. थोडासा आजार बरा झाला की पुन्हा मुंबईची वाट धरते. परंतु पुन्हा आजार डोके वर काढतो. त्यामुळे ती धंदयाला सततच्या आजारामुळे नालायक ठरते. शिवाय या अनीतिच्या धंदयात तिला दारुचेही व्यसन जडलेले असते. [४३]

या धंदयामध्ये इतका वाईट अनुभव येऊनसुध्दा हया स्त्रिया आपली अनीतिची परंपरा चालू राहण्याकरिता स्वत:ला मुली नसल्या तर दुसऱ्यांच्या मुली हौसेने दत्तक घेऊन किंवा विकत घेऊन त्यांना या धंदयाचे लहानपणापासून शिक्षण देतात व त्यांच्या जिवावर कल्पनेचे मनोरे बांधतात.

## देवदासींच्या संबंधित अनिष्ट सणउत्सवाचे स्वरुप

महाराष्ट्र व कर्नाटकांच्या सीमाभागात देवदासींची संख्या फार मोठी आहे. देवदासी ही देवाची स्त्री मानली जाते. त्यामुळे तिला देवाधर्माच्या नावावर काही अनिष्ट सण, उत्सव साजरे करावे लागतात. त्यामध्ये 'ओकळी' व सिडीआटू हे दोन महत्वाचे खेळ आहेत. मुद्दाटनूर आणि कलकुंबा ही कर्नाटकातील बेल्लारी जिल्हयातील दोन खेडी असून तेथे हनुमानाचे मंदिर आहे. या मंदिरासमोर आडाइतका मोठा हौद आहे. होळी सणाच्या दिवशी रंग खेळण्याकरिता हा हौद रंगाने भरला जात असे. खास रंग तयार करण्यासाठी हा हौद बांधण्यात आलेला असून दुपारी गावातील सर्व लोक मंदिरासमोर जमा होत असत. गावातून पाटील, देसाई, इनामदार, गौडर, रेड्डी या बड्या लोकांची तरुण मुले वाजत-गाजत मिरवणुकीने हौदाजवळ येत, तर दुसरीकडून दलित वस्तीतून तरुण देवदासीही मिरवणुकीने येत असत. [४४] नंतर देवदासी आल्या की त्यांना साडी चोळी दिली जात असे. ती त्या सर्वांसमक्षच नेसत असत. त्यानंतर 'ओकळीला' सुरुवात होई (ओकळी हा रंगपंचमी सारखा सण असे) त्यावेळी हौदाजवळ थांबलेले तरुण तांब्याने रंग भरुन देवदासींवर शिंपडत, आणि क्षणातच देवदासी नग्न झाल्यासारखी वाटे..... देवदासींच्या पाठीमागून तरुण त्यांच्यावर रंग फेकीत, त्यांना मिठीत घेत, कुरवाळत, फक्त संभोग वगळता पाहिजे ते चाळे करण्यास त्यादिवशी त्यांना धर्माने मुभा दिलेली असे. रात्री आठपर्यंत हा खेळ चालत असे. [४५] सर्वजण या

प्रकाराला प्रोत्साहन देत असत. सुमारे दोन-तीनशे वर्षापूर्वी या प्रथेचे जे स्वरुप होते. त्यापेक्षा काळाच्या ओघात ती बरीच सौम्य झाल्याचे लोक सांगतात. महाराष्ट्रामध्ये असे प्रकार फारसे घडत नाहीत. या अनिष्ट प्रथेवर अगदी अलिकडे म्हणजे १९८५ मध्ये कर्नाटकातील पोलीसांनी समाजातील पुरोगामी संघटनांच्या मदतीने बंदी घातली असे दिसते.

अशीच एक दुसरी प्रथा म्हणजे ' सिडीआटू ' चा खेळ होय. हा खेळ कर्नाटकातील 'मदकेरीपुरा' या गावी जोगम्मादेवीच्या जत्रेत खेळला जातो. तेथील ग्रामदेवतेच्या मंदिरासमोर पाच फूट उंचीचा एक रुंद खांब रोवला जातो. त्यावर ३०-४० फूट लांबीचा दुसरा खांब रोवला जाई. त्यावर दुसरा वासा आडवा बसविला जाई. त्याच्या एका टोकाला दोरखंड बांधला जाई आणि देवदासींच्या पाठीच्या मणक्यात टोकदार लोखंडी हुक खूपसून तो हुक आडव्या वाशाच्या दुसऱ्या टोकाला अडकविला जाई. हुक खुपसलेल्या जखमेवर देवीचा भंडारा टाकला जाई. मग दोरी खोली ओढली जाई. त्यामुळे दुसरे टोक वर जाई आणि देवदासी आडव्या वाशाला अंधातरी हुकाला लटकत राही. त्यानंतर गावाचे हक्कदार दोरीला धरुन आडवा वासा आकाश पाळण्यासारखा गोल फिरवीत. तेंव्हा जमीनीपासून ५० फूट उंचीवर गोल फिरत असलेली ती देवदासी दोन्ही हात जोडून सर्वांना नमस्कार करी. त्यावेळी कमरेपर्यंतचा उघडा पडलेला भाग सर्वांना दिसे. तेंव्हा टाळ्या वाजवून व देवीचा जयजयकार करुन जमलेले लोक त्या प्रकाराचे कौतुक करीत. ती एक रुढी होती व देवीचा नवस फेडण्याचा प्रकार होता.[४६]

पण हा खेळ सोपा नाही. तो निर्दयी आणि जीवघेणा आहे. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचे अनिष्ट खेळ, सण, उत्सव साजरे केले जात नाही. फक्त कर्नाटकातील देवदासींमध्येच ही प्रथा अस्तित्वात आहे. ' सिडीआटू' खेळाच्या बाबतीत असे म्हणतात की देवदासी गावाच्या हितासाठी हा खेळ खेळते. पण त्यामध्ये तिच्या पाठीला काहीही इजा होत नाही. ही सर्व देवाची करणी आहे, असा भक्तांमध्ये समज आहे. पण देवाच्या साक्षीने देवदासींशी प्रणयक्रीडा केल्यास गावात सुखशांती नांदते, गावावर अरिष्ट येत नाही, हा या प्रथेमागचा समज होता. विशेष म्हणजे या अश्लील खेळात भाग घेण्यासाठी दलित त्यातल्या त्यात तरुण देवदासीच लागतात. सवर्ण समाजातील देवदासी या खेळासाठी चालत नसत. दारिद्रयात आणि अज्ञानाच्या अंधकारात पिचणाऱ्या दलित देवदासी कोणतीही तक्रार न करता खेळात भाग घेत. त्याबद्दल त्यांना मिळणारी साडीचोळी, नारळसुपारी मोलाची वाटत असावी असे दिसते.[४७]

अगदी अलिकडे सुशिक्षित तरुणांच्या विरोधांमळे तो जीवघेणा प्रकार बंद झाला. कर्नाटक सरकारनेही त्या खेळावर आणि प्रथेवर १९८७ साली कायद्यान्वये बंदी घातली. [४८]

अशाप्रकारे अस्पृश्य, मागासलेल्या समाजांमध्ये देवदासी प्रथा अस्तित्वात होती आणि आहे. विसाव्या शतकात त्याविरुध्द अनेक लढे झाले, चळवळी झाल्या तरी आजही तिचे समूळ उच्चाटन करता आले नाही. सुरुवातीच्या काळातले स्वरुप थोडेफार बदलत गेले असलेतरी मूळ प्रथेशी निगडीत प्रतीके अथवा सण किंवा खेळ किंवा अन्य काही प्रथा - परंपरा आजही पाळल्या जातात.

# तळटिपा आणि संदर्भ


१) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोष खंड - ७, महाराष्ट्र राज्य मराठी विश्व कोष निर्मिती मंडळ, मुंबई, १९७७, पृ. ९१०.

२) महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण परिपत्रक ६/८/१९९४.

३) देवदासी मुक्ती संघटनेचे अध्यक्ष प्रा. विठ्ठल बन्ने यांची प्रत्यक्ष मुलाखत - दि.१ जून २००५.

४) बळवंत कांबळे - भारतातील देवदासी प्रथा, चळवळ आणि पुनर्वसन श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे, प्रथमावृत्ती १८ मे २०००, पृ. १९.

५) डॉ. मदन कुलकर्णी - देवदासी यल्लम्माच्या जोगतिणी विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सीताबर्डी, नागपूर, प्रथमावृत्ती २३ जून १९९४, पृ.६०.

६) कित्ता ; पृ. ५३.

७) देवदासी मुक्ती संघटनेतील प्रमुख पुनर्वसित देवदासी महिला गौराबाई सलवादे यांची मुलाखत दि.१ जून २००५.

८) बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. २६.

९) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ.५९.

१०) कित्ता; पृ. ५९.

११) बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. ३०, ३१.

१२) पंडित महादेवशास्त्री जोशी - भारतीय संस्कृती कोष खंड-७,संगम प्रेस लि. पुणे, प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट १९७९, पृ. २९५.

१३) डॉ. मदन कुलकर्णी ; उपरोक्त, पृ. ५२.

१४) डॉ. रा.चि. ढेरे - लज्जागौरी श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे, प्रथमावृत्ती २० जून १९७८, पृ.६०.

१५) कित्ता; पृ. ५९, ६० .

१६) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोकत, पृ. ५१.

१७) डॉ. रा.चि. ढेरे ; उपरोक्त, पृ. ६४.

१८) पंडित महादेवशास्त्री जोशी; उपरोक्त, पृ. २९५.

१९) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ५१.

२०) बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. २७.

२१) वसंत राजस - देवदासी शोध आणि बोध
सुगावा प्रकाशन ८६१/१, सदाशिव पेठ, पुणे,
प्रथमावृत्ती जुलै १९९७, पृ.१०.

२२) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ५६, ५७.

२३) बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. २७.

२४) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ५५.

२५) वसंत राजस; उपरोक्त, पृ. १०.

२६) डॉ. रा.चि. ढेरे; उपरोक्त, पृ. ६७, ६८.

२७) जयमल्हार वाघ्या मुरळी संघटनेचे अध्यक्ष श्री. बाबासोा कृष्णा बोधे यांची प्रत्यक्ष मुलाखत दिनांक ३ जुलै २००५.

२८) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ.६०.

२९) बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ.३१.

३०) वसंत राजस; उपरोक्त, पृ. ८.

३१) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ६१.

३२) बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. ३२.

३३) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ६१.

३४) बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ.३२.

३५) कुलकर्णी डॉ. मदन; उपरोक्त, पृ. ६२.

३६) वसंत राजस; उपरोक्त, पृ. ११.

३७) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ६९.

३८) उत्तम कांबळे - देवदासी आणि नग्नपूजा न्यू एज प्रिटींग प्रेस,
भूपेश गुप्ता भवन, प्रभादेवी, मुंबई, चौथी आवृत्ती(I),
जून २००२, पृ.१३.

३९) वसंत राजस; उपरोक्त, पृ.७.

४०) डॉ. नरेंद्र दाभोळकर - अंधश्रध्दा विनाशाय राजहंस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती १९९०, पृ.१८८.

४१) बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. ३३.

४२) पुरुषोत्तम गोविंद नाईक - वेश्या व वेश्या व्यवसाय, वैभव प्रेस, सँडहार्ट रोड, गिरगाव, मुंबई, दुसरी आवृत्ती १९४८, पृ. १९, २०.

४३) कित्ता; पृ. २०, २१.

४४) उत्तम कांबळे; उपरोक्त, पृ. १७.

४५) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ६६.

४६) वसंत राजस; उपरोक्त, पृ. २६, २७.

४७) उत्तम कांबळे; उपरोक्त, पृ. १७, १८.

४८) वसंत राजस; उपरोक्त, पृ.२७.